नियमित दिवाणी दावा क्र. १३०/२०१८
सुनिता –वि– साहेबराव
निशाणी क्र. २५ लगत

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. डी. एस. ठाले यांच्याद्वारे</u>**

०६. मला लिहता वाचता येते. दावा मिळकतीचे क्रमांक १६७ व १६९ असे आहेत. गट क्र.१६७ पैकी ७ एकर २० गुंठे व गट क्र.१६९ पैकी १ एकर क्षेत्र हा प्रस्तुत दाव्याचा विषय आहे. मी सदर दोन्ही मिळकतीचे ७/१२ उतारे पाहिलेले आहे. दावा मिळकत गट क्र.१६७ मध्ये साहेबराव गाढेकर यांच्या घरातील पाच लोकांची नावे आहेत व अन्य लोकांची नावे मला सांगणे शक्य नाही. मी दावा मिळकती पाहिलेल्या आहेत. दावा मिळकत गट क्र.१६९ या मिळकतीस किती लोकांची नावे आहेत हे मला सांगता येणार नाही. गट क्र.१६७ चे एकुण क्षेत्र अंदाजे ४० एकर असून गट क्र.१६९ चे क्षेत्र मला सांगणे शक्य नाही. आजरोजी दावा मिळकती आशाबाई गाढेकर यांच्या नावे आहेत.

०७. आशाबाई गाढेकर यांच्या नावे दावा मिळकती खरेदीने आलेल्या आहेत. मी सदर खरेदीबाबत कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे मला सांगता येणार नाही की, आशाबाई गाढेकर यांनी दावा मिळकत गट क्र.१६७ कोणाकडून विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८२ मध्ये गट क्र.१६७ मधील मिळकत आशाबाई यांनी भागाजी फुके यांचेकडून विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८८ मध्ये गट क्र.१६९ ही मिळकत आशाबाई यांनी लालसिंग चांदवाडे यांचेकडून खरेदी घेतली होती. सदर दोन्ही मिळकती संबंधित वर्षापासून आशाबाई गाढेकर यांच्या नावे नोंदलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही मिळकतींची वहिवाट आशाबाई करत आहेत.

०८. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या वडिलोपार्जित अगर एकत्र कुटुंबाच्या मिळकती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती आशाबाई यांना त्यांच्या वडिलांनी स्त्रीधन स्वरुपामध्ये दिलेल्या आहेत. माझे ज्यावेळी लग्न झाले त्यावेळी विश्वासचे वय १९ वर्षे इतके होते व त्यांचे जन्मसाल सन १९९२ होते. माझे लग्न सन २०११ मध्ये झाले होते. माझे लग्न झाले त्यावेळी प्रतिवादी क्र.३ संतोषचे वय अंदाजे २२ वर्ष होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ व ६ यांचा सन १९८२ मध्ये जन्मदेखील झाला नव्हता. सन १९८२ मध्ये प्रतिवादी क्र.७ चे वय अंदाजे ४ ते ५ वर्ष होते. माझे पती विश्वास यांचे अपघाती निधन झाले. हे म्हणणे खरे आहे की, विश्वास मयत होईपर्यंत प्रतिवादी माझा सांभाळ उत्तमरित्या करत होते.

०९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे ज्यावेळी लग्न झाले त्यावेळी माझे पती विश्वास व प्रतिवादी क्र.३ संतोष हे अज्ञान होते व त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नव्हते.

प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे लग्न माझ्या लग्नापुर्वी झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या लग्नाबाबत जो काही खर्च झाला त्याबाबत मला माहिती नाही. माझ्यासमक्ष माझे पती व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.५ ते ७ यांना आर्थिक मदत केली होती. सदर मदतीपोटी कोणताही दस्तऐवज अस्तित्वात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी रक्कम रु.१,००,०००/– स्विकारुन हक्कसोड केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तोंडी हक्कसोड केल्याचे मी खोटे सांगत आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझे पती विश्वास अगर उर्वरित प्रतिवादी यांचा कोणताही हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत विश्वासची पत्नी या नात्याने मला दावा मिळकतीचे वाटप मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, विश्वास मयत झाल्यानंतर मी माझ्या माहेरी राहण्यास आहे. हे म्हणणे खरे नाही की, विश्वास मयत झाल्यानंतर देखील प्रतिवादी माझा सांभाळ चांगल्या पद्धतीने करतील असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी मला घरातून हाकलुन दिल्याबाबत मी खोटा मजकुर कथीत केला आहे. माझे लग्न झाले त्यावेळी विश्वास यांची वडिलोपार्जित जमीन अस्तित्वात होती. माझ्या म्हणण्याप्रमाणे सदर मिळकतीचा गट क्र.२१८ हा होता. माझ्या म्हणण्याप्रमाणे सदरची जमीन प्रतिवादी क्र.१ साहेबराव यांच्या नावाने होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२१८ वडिलोपार्जित असल्याचे मी खोटे सांगत आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींकडून पैसे उकळण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे. माझे दुसरे लग्न झालेले आहे. मला दुस–या लग्नामधून एक अपत्य असून मी सदर व्यक्तीसोबत नांदत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे दुसरे पती विष्णु यांच्या सांगण्यावरुन प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(मयुरेश आर. काळे)

दिनांकः १९.०१.२०२६

दिवाणी न्यायाधीश क. स्तर

भोकरदन